स्मृतिपटलावरील आठवणी

आईचे बोट घट्ट धरून घाबरत घाबरत शाळेची चढलेली पायरी,

सर्वत्र भिरभिरणारी ती कावरीबावरी नजर,

शाळेचा माझा पहिला दिवस.

शाळेशी मग जमली गट्टी.

दिवसा मागून दिवस सरले ,

दरवर्षी नवीन शिक्षक, नवीन मैत्रिणी,

नवा अभ्यास , सर्व काही नवे

पण अभ्यासाचे ओझे कधी वाटले नाही फार,

शिक्षकांच्या प्रेमळयुक्त धाकाचा नेहमीच वाटला आदर,

विज्ञान फार काही जवळचे वाटले नाही कधी, पण मन लावून केला मात्र अभ्यास.

गणिताची गोळाबेरीज जमली मात्र छान.

इतिहास व भूगोल साठी घाम गाळला खूप,

संस्कृत भाषेवर जडला माझा जीव,

मराठी व इंग्रजी माझे आवडीचे फार , मन माझे रमते त्यात.

माझ्या कल्पनेचा अविष्कार दिसतो चित्रकलेत कधीकधी ,

शाळेच्या ह्या आठवणी , फेर धरून पिंगा घालतात.

माझ्या मनाचा हळवा कोपरा ,

शाळेच्या आठवणी कस्तुरी सारख्या मनी घर करून आहेत कायमच्या,

सुगंध दरवळतो माझ्या जीवनी

घडा कधी रिता न होण्यासाठी.

तुमच्यासारखे शिक्षक आले जीवनी ,

जीवन सार्थक झाले माझिया ||

**भाग्यश्री प्रभूतेंडोलकर**